महाराष्ट्र शासन

# निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०० ०५१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२०८६१०१५ ईमेल आयडी-supdt.mumbai@rof.maharashtra.gov.in

क्रमांक: -निभासं-७३(अ)/परिपत्रक/(४३/२२)/दोन/ २२२ दिनांक:- ३०/०५/२०२४

**(वाचा:- रसिकलाल अॅन्ड कंपनी विरुध्द कमिशनर ऑफ इन्कम टॅक्स, (१९९८) २२९ आयटीआर ४५८ हा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल)**

## :: परिपत्रक ::

भारतीय भागीदारी कायदा-१९३२ नुसार भागीदारीमध्ये व्यवसाय करताना भागीदारी संस्थेमध्ये हिंदू अविभक्त कुटूंब (एच.यु.एफ.) भागीदार म्हणून समाविष्ट होऊ शकत नाही, तर कर्ता म्हणूनही कुटूंबातील सदस्य भागीदार होऊ शकत नाही. कुटूंबातील सदस्य त्यांच्या स्वतंत्र धारणा क्षमतेमध्ये (Individual Capacity) भागीदार होऊ शकतो.

तसेच ट्रस्टला कायदेशीर अस्तित्व नाही. ट्रस्ट मालमत्ता घेऊ शकत नाही अथवा करारनामा करु शकत नाही. ज्या भागीदारी संस्थांमध्ये ट्रस्ट अथवा हिंदू अविभक्त कुटूंब (एच.यु.एफ.) कर्ता भागीदार म्हणून समाविष्ट झाले असतील अशा भागीदारी संस्थांची कायदेशीर अस्तित्व नसल्याने नोंदणी करता येणार नाही.

सबब, वरील संदर्भास अनुसरुन हिंदू अविभक्त कुटूंब (एच.यु.एफ.) कर्ता अथवा ट्रस्ट भागीदार असलेल्या भागीदारी संस्थांना तसे आक्षेप कळविण्यांत यावेत.

**(क.स.नावंदर)**
**निबंधक भागीदारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत:-

१) सर्व कर्मचारी (माहितीस्तव).
२) सहायक निबंधक भागीदारी संस्था, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर.
३) आस्थापना नस्ती.
४) निवड नस्ती.